RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १२, अंक ६३(२)] शुक्रवार, ऑगस्ट २१, २०२६/श्रावण ३०, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक १०५

प्राधिकृत प्रकाशन

### मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई.

### शुद्धिपत्रक -१

क्रमांक अतिक्रमण नियंत्रण कक्ष/प्र.शा./अ.क्षे/अ.बां./म.प्रा.नि.व.न.र./अ.प्र./१६०६/२०२६.—ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने, प्राधिकरणाच्या विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम, विना परवानगी वापर किंवा विना परवानगी वापरात बदल, यावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणेकामी प्राधिकरणाच्या विविध नियोजन विभागातील अधिका-यांची, अधिसूचना क्रमांक अतिक्रमण नियंत्रण कक्ष/प्र.शा./अ.क्षे/अ.बां./म.प्रा. नि.व न.र./अ.प्र./३१०/२०२५, दि.०९ जुलै, २०२५ अन्वये पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्ती केली असून, उक्त अधिनियमाच्या कलम ५२, ५३, ५४, ५५, ५६ व ५७ मधील तरतुदीप्रमाणे अंमलबजावणी करणेकामी त्यांच्या पदासमोर दर्शविलेल्या विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्राकरिता अधिकार प्रदान केले आहेत.

**आणि ज्याअर्थी,** सदर अधिसूचनेतील तक्त्यामधील अ.क्र. ४ येथील ओशिवरा जिल्हा केंद्र व पवई अधिसूचित क्षेत्राऐवजी ओशिवरा जिल्हा केंद्र वाचावे असे शुद्धिपत्रक क्र. :अतिक्रमण नियंत्रण कक्ष /प्र.शा. / अ.क्षे / अ.बां ./ म.प्रा.नि.व.न.र./अ.प्र./१५६७/२०२५, दिनांक १३.०८.२०२५ रोजी निर्गमित केले आहे.

**आणि ज्याअर्थी,** मेट्रो कार डेपोंच्या, नेरळ परिसर अधिसूचित क्षेत्र, कर्जत परिसर अधिसूचित क्षेत्र, पोयनाड परिसर अधिसूचित क्षेत्र, अलिबाग परिसर अधिसूचित क्षेत्र, खारबांव इन्टीग्रेटेड बिझनेस पार्क अधिसूचित क्षेत्र व मुं. म. प्र. वि. प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पा करिता मुं.म.प्र.वि.प्राधिकरण "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून कार्यरत असल्याने या क्षेत्रांकरिता पदनिर्देशित अधिकाऱ्यांना नियुक्त करणे गरजेचे असल्याने शुद्धिपत्रक क्र. १ निर्गमित करणे आवश्यक आहे.

**आणि ज्याअर्थी,** सदर अधिसूचनेतील तक्त्यामधील अ. क्र. ६ नंतर मेट्रो कार डेपोंच्या, नेरळ परिसर अधिसूचित क्षेत्र, कर्जत परिसर अधिसूचित क्षेत्र, पोयनाड परिसर अधिसूचित क्षेत्र, अलिबाग परिसर अधिसूचित क्षेत्र, खारबांव इन्टीग्रेटेड बिझनेस पार्क अधिसूचित क्षेत्र व मुं. म. प्र. वि. प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पा करिता जमिनींकरिता खालील नोंद समाविष्ट करणे आवश्यक आहे.

| अ.क्र.<br>(१) | विशेष नियोजन क्षेत्र<br>(२) | महसुली गावाचे नाव/विभाग/सेक्टर<br>(३) | पदनिर्देशित अधिकाऱ्याचे पदनाम<br>(४) |
|---|---|---|---|
| ७. | विद्यमान मेट्रो कार डेपोंच्या जमिनींकरिता | दहिसर, मालवणी, पहाडी गोरेगाव, मंडाले, तुर्भे, विक्रोळी, कांजूर, मोघरपाडा, डोंगरी | नियोजक / Planner<br>उप नियोजक / Dy. Planner |
| ८. | नेरळ परिसर अधिसूचित क्षेत्र | बोपले, धामोते, ममदापूर, नेरळ, बांधिवली, बेडीसगांव, भडवळ, बोर्ले, दामत, कोल्हारे, शेलू, सापे, चामटोली, दहिवली, देवळोली, जांभळे, कासगांव, सावरे, डोणे, गोरेगाव, कुडसावरे, ढवळे, ढवळेपाडा, वांगणी | नियोजक / Planner<br>उप नियोजक / Dy. Planner |
| | कर्जत परिसर अधिसूचित क्षेत्र | आंबिवली बुद्रुक, आसल, बेकरे, भानसोली, चिंचवली, डिकसळ, गारपोली, जिते, कुंभे, माणगाव तर्फे वरेडी, उक्रुळ, वडवली तर्फे वरेडी, एकसळ, पाली तर्फे वरेडी, आशाणे, बामणोली, बार्डी, भुतिवली, किरवली, कोशाणे, सावरगाव, उमरेली, वांजळे, वावे, हालिवली, लाडीवली, देऊळवाडी, पराडे | |
| | पोयनाड परिसर अधिसूचित क्षेत्र | पेझारी, दिवलांग, भंगार दादाजी, तळबंद, घसवड, तळाणीखार, वालवडे, पोयनाड, आंबेपूर, शहाबाज (भाग), शहापूर (भाग) | |
| | अलिबाग परिसर अधिसूचित क्षेत्र | चेंढरे, वरसोली, गोंधळपाडा, वेश्वी, थळ, वायशेत, खंडाळे, नेहुली, मुळे, बामणोली, लोणारे | |
| ९. | खारबांव इन्टीग्रेटेड बिझनेस पार्क अधिसूचित क्षेत्र | दिवे, केवणी, राहणाळ, डुंगे, कालवार, वडघर, वडूनवघर, कारिवली, टेंभवली, जुनादुर्खी, शिवाजीनगर, कांबे, दहयाळ, खोणी, काटई, बोरपाडा, वाघीवली, कोल्हीवली, शेलार, सावंधे, गोरसई, कवाडखुर्द, सोनटक्का, भिनार, निंबवली, काशीवली, धामणगाव, वडपे, कुहे, धामणे, लाखिवली, आलखिवली, चिंबीपाडा, पिळंझेखुर्द, खारबांव (सी.टी.) मालोडी, पाये, पायगाव, खार्डी, पालीवली, फिरंगपाडा, गाणे, ब्राम्हणगाव, नागले | नियोजक / Planner<br>उप नियोजक / Dy. Planner |
| १०. | मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामार्फत राबविले जाणारे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत क्षेत्र | - | उप नियोजक / Dy. Planner |

**म्हणून आता,** त्याअर्थी सदर अधिसूचनेतील तक्त्यामधील अ.क्र. ६ नंतर मेट्रो कार डेपोंच्या, नेरळ परिसर अधिसूचित क्षेत्र, कर्जत परिसर अधिसूचित क्षेत्र, पोयनाड परिसर अधिसूचित क्षेत्र, अलिबाग परिसर अधिसूचित क्षेत्र, खारबांव इन्टीग्रेटेड बिझनेस पार्क अधिसूचित क्षेत्र व मुं. म. प्र. वि. प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाकरिता जमिनींकरिता नोंद समाविष्ट करण्यासाठी शुध्दिपत्रक-१ निर्गमित करून सुधारणा करीत आहे.

मुंबई,
दिनांक २० ऑगस्ट २०२६.

**डॉ. संजय मुखर्जी,** (भा.प्र.से.),
महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.